(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय संविधान आणि लोकशाही शासन व्यवस्था

डॉ. येरगे ए .जी सहाय्यक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक श्री संपतराव माने महाविद्यालय, खानापूर जि.सांगली

---

**प्रास्ताविक -**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगामधील अनेक वसाहतिक देश स्वतंत्र झाली . त्यातील अनेक देशांनी लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली त्यामध्ये भारत देशही होता . परंतु त्यातील काही देशानांच लोकशाही शासन व्यवस्था टिकवता आली . त्यामधील सर्वात महत्वाचा देश म्हणजे भारत होय . भारत देशामध्ये जेवढी प्रादेशिक , सांस्कृतिक , भाषिक ,धार्मिक भिन्नता आहे तेवढी भिन्नता जगातील इतर कोणत्याही देशामध्ये पहावयास मिळत नाही . या सर्वांना एकतेमध्ये बांधून आदर्श लोकशाही निर्माण करणे आणि आज स्वतंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही ती टिकवणे यामध्ये भारतीय संविधानाचा खूप मोठा वाटा आहे . जगातील अनेक राष्ट्रांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून आपल्या संविधान निर्मात्यांनी भारत देशातील सर्व प्रकारच्या विविधतेला सामावून घेणारी ,सर्व घटकांना न्याय देणारे संविधान निर्माण केले . संविधानाच्या जोरावर आज आपली लोकशाही शासन व्यवस्था संपूर्ण जगाला दिशादर्शक व मार्गदर्शक ठरत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यात आली आणि त्या राज्यघटनेमध्ये लोकशाही शासन व्यवस्थेचा पुरस्कार करण्यात आला. स्वातंत्र्य, समता ,बंधुता ,न्याय ,सार्वभौमत्व ,धर्मनिरपेक्षता, समाजवाद, संघराज्य शासन, सामूहिक जबाबदारी , सत्तेचे विभाजन , मूलभूत हक्क, प्रौढ मताधिकार , संसदीय शासन , बहुपक्ष पद्धती इत्यादी लोकशाही वैशिष्ट्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला. संविधान निर्मात्यांनी संविधान निर्मितीच्या वेळेस संविधानास स्थल , काल, परिस्थितीनुसार परिवर्तनीय ठेवले आहे . कारण बदलत्या परिस्थितीमध्ये भविष्यातील आव्हानांना सामोरे जात असताना संविधानात बदल करणे ,दुरुस्ती करणे सोयीचे व्हावे हा हेतू होता . संविधानाची योग्य अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाचे तिन्ही विभाग म्हणजेच कायदेमंडळ , कार्यकारी मंडळ , न्यायमंडळ यांच्यावर सोपविण्यात आले . परंतु स्वातंत्र्यप्राप्ती पासून आजपर्यंत शासनकर्ता वर्ग कमीअधिक प्रमाणात आपणास अनुकूल असा संविधनाचा अर्थ लावून संविधानास अपेक्षित असणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रतिकूल वर्तन करताना दिसत आहेत . लोकशाहीच्या नावाखाली भारतीय संविधानास अपेक्षित लोकशाही शासन व्यवस्थेच्या विरुद्ध अनेक गोष्टी घडत आहेत त्याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात घेण्यात आलेला आहे.

**मुलभूत संकल्पना** – संविधान, लोकशाही , स्वातंत्र्य , समता, न्याय

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये –**

1. भारतीय संविधानाचे श्रेष्ठत्व समजून घेणे .
2. भारतीय संविधानातील लोकशाही मुल्यांचा अभ्यास करणे .
3. संविधानास अपेक्षित भारतीय शासन व्यवस्थेच्या कार्याचा आढावा घेणे .

**शोध निबंधाची गृहीतके –**

1. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षा नंतरही भारतीय लोकशाही अबाधित आहे यावरून भारतीय संविधानाचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.
2. भारतीय संविधानात स्वातंत्र्य, समता ,बंधुता ,न्याय ,सार्वभौमत्व ,धर्मनिरपेक्षता, मुलभूत हक्क , प्रौढ नागरिकत्व इत्यादी लोकशाही मुल्यांचा समावेश आहे .
3. शासन संविधानास अपेक्षित असणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रतिकूल वर्तन करताना दिसत आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत शोध निबंधाच्या लिखाणासाठी शास्त्रीय, ऐतिहासिक , विश्लेषणात्मक ,आदर्शवादी संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे . सदर शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनाचा अवलंब करण्यात आला आहे . त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके , वर्तमानपत्रे , इंटरनेट वरील उपलब्ध माहिती इत्यादी माहितीचा उपयोग करण्यात आला .

**मुख्य आशय –**

भारतीय संविधानातील अनेक तरतुदींच्या माध्यमातून भारत देश हा लोकशाही शासन व्यवस्थेचा कट्टर पुरस्कर्ता असल्याचे दिसून येते .भारतीय जनता ही संविधानाचे मूळ उगमस्थान असल्याचे संविधानाच्या उद्देश पत्रिकेमध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे . संविधानाअंतर्गत अनेक लोकशाही शासन संस्थाची निर्मिती करण्यात आले , त्या संस्थाचे अधिकार आणि कार्याचे स्पष्ट विवेचन त्यात करण्यात आले. संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करून कायदेमंडळ , कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांच्यावर संविधानाच्या अंमलबजावणीची जबाबदारी टाकण्यात आली .शासन संस्थेचे अधिकार , कार्य ,जबाबदारी आणि नियंत्रण यांची स्पष्ट तरतूद संविधानात करण्यात आले. संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार करून संविधाननिर्मात्यांनी त्यामध्ये

एकात्म शासन पद्धतीच्या काही वैशिष्ट्यांचा स्वीकार केला. संविधानात केंद्र व घटक राज्य सरकार यांच्या अधिकाराचे विभाजन व कार्याचे सविस्तर विवेचन केले आहे , जेणे करून केंद्र व घटक राज्य सरकारे यांच्यात वाद उत्पन्न होऊ नयेत. तसेच कुठलेही शासन किंवा संस्था जनतेचे हक्क हिरावून घेऊ नयेत म्हणून संविधानात मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. भारताने अप्रत्यक्ष म्हणजेच प्रातिनिधिक लोकशाही शासन स्वीकारले आहे.ज्यामध्ये जनता आपले प्रतिनिधी निवडून त्यांच्यामार्फत राज्यकारभार चालवत असते. लोकशाहीमध्ये निवडणुकीला जास्त महत्व असते आणि त्या निवडणुका निष्पक्ष आणि पारदर्शकपणे घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. निवडणुकीत मतदान करण्यासाठी जात,धर्म, भाषा,पंथ,प्रदेश,वर्ग,लिंग या कशाच्याही आधारे भेदभाव न करता १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या सर्वच भारतीय
स्त्री - पुरुष नागरिकांना मताधिकार दिला गेला आहे . भारतीय संविधानाचा अर्थ लावण्यासाठी ,जनतेच्या मुलभूत हक्काचे रक्षण करण्यासाठी तसेच संघराज्य व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष न्याय व्यवस्थेची तरतूद संविधानात करण्यात आलेली आहे. तसेच संविधानात स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांचा पुरस्कार करून भारतीय लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा परिस्थितीमध्ये केंद्र आणि घटक राज्यांमध्ये कुठल्याही राजकीय पक्षांचे सरकारे जरी अस्तित्वात आली तरी त्यांनी संविधानास अनुसरूनच आपला कारभार करणे अपेक्षित असते. परंतु अलीकडे संविधानाचा मूळ उद्देश किंवा संविधानास अपेक्षित असणारी लोकशाही शासन पद्धती यास तिलांजली दिली जात आहे . लोकशाहीच्या नावाखाली संविधानाचा हवा तसा अर्थ लावून सत्ता प्राप्त करणे व ती टिकवण्यासाठी संविधानिक, असंविधानिक अशा सर्व मार्गाचा अवलंब केला जात आहे, जो भारतीय संविधानाला अपेक्षित नाही. ते पुढील काही मुद्द्यांच्या आधारे आपण समजून घेऊयात.

**बहुमताने निर्णय घेणे म्हणजे लोकशाही नव्हे –**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये निर्णय घेत असताना बहुमताला महत्त्व दिले जाते .परंतु बहुमताने घेतलेला प्रत्येक निर्णय बरोबर असतोच असे नाही, किंवा बहुमताने निर्णय घेत असताना अल्पसंख्यांकांचे ऐकायचेच नाही असेही नाही. लोकशाहीला बहुमताचे शासन असे जरी आपण म्हणत असलो तरी भारतीय संविधानास बहुमताचे शासन यामध्ये अल्पसंख्यांकाच्या हक्काचे रक्षण अपेक्षित आहे. फ्रेंच राजकीय तत्त्वज्ञ डी.टॉकविल यांनी आपल्या "Democracy in America" या ग्रंथात अमेरिकन लोकशाहीचा अभ्यास करून त्यात त्यांनी 'लोकशाहीतील बहुसंख्यकांच्या जुलूमशाहीच्या ' धोक्याचा इशारा दिला. केशवानंद भारती प्रकरणात न्यायालयाने 'संविधानाच्या मूलभूत संरचनेचे' तत्त्व स्पष्ट करताना म्हटले की , संविधानाच्या मूलभूत रचनेला बाधा न पोहचवता त्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. संसद सर्वोच्च आहे व त्यातील बहुमताच्या जोरावर सरकारे हवे ते कायदे करू शकतात .परंतु त्यांनी ते करीत असताना संविधानाच्या चौकटीची मर्यादा ठेवणे गरजेचे आहे . कारण लोकशाहीला केवळ बहुमतापुरते मर्यादित ठेवणे चुकीचे ठरेल. तसे झाले तर बहुमताच्या लोकशाहीचे रुपांतर बहुमताच्या हुकुमशाहीत कधी होईल हे कळणारही नाही म्हणून बहुमाताच्या लोकशाहीतील हुकुमशाही टाळण्यासाठी लोकशाहीत चार मूलभूत तत्वांचा अवलंब केला गेला पाहिजे. त्या म्हणजे बहुमताची सत्ता, अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण, घटनात्मक सरकार आणि चर्चेद्वारे शासन हे होत . यातील एकही घटक बाहेर काढला तरी लोकशाही कोलमडून पडेल.

**भारतीय निवडणूक पद्धतीतील दोष –**

पाश्चात्य विचारवंत प्लेटो यांनी त्यांच्या ' द रिपब्लिक' या पुस्तकाच्या सहाव्या प्रकरणात लोकशाहीवर भाष्य केले आहे. त्यांच्या मते लोकशाहीत बहुमताने निवडणुकीच्या माध्यमातून शासन चालवणारा आपला प्रतिनिधी निवडणे चुकीचे आहे. कारण शासन कारभार करणारा व्यक्ती बहुसंख्याकांना आवडणारा नसावा, तर शासन कारभाराची जाण असणारा, बुद्धिमान असावा. प्लेटो वरील भूमिका प्रश्नाच्या स्वरुपात समजावण्याचा प्रयत्न करतो .उदा: तुम्ही भर समुद्रात एका जहाजावर असताना काय कराल?

1. जहाज कशा पद्धतीने व कुणी चालवायची हे ठरवण्यासाठी निवडणूक घ्याल?
2. की जहाजावर उपस्थित असणाऱ्या कोणाला जहाज चालवता येते का, याचा शोध घ्याल?

"तुम्ही जर दुसरा पर्याय निवडलात तर याचा अर्थ असा की यासारख्या परिस्थितीमध्ये एखाद्या विषयाची जाण असणं वा कौशल्यं असणं महत्त्वाचं ठरतं. जीवन-मरणाचा प्रसंग आलेला असताना आता पुढे काय करायचं, असा विचार करत बसणाऱ्या नवशिक्याला अशा वेळी प्राधान्य दिलं जाणार नाही. मग एक अशीच मोठी जहाज ज्याला राज्य म्हणतात, ती चालवणाऱ्यांची निवड निवडणुकीच्या माध्यमातून निवडण्याऐवजी राज्याचं नेतृत्व करण्यासाठी एखाद्या अनुभवी व्यक्तीचा शोध घेणं हा चांगला पर्याय असेल". असे प्लेटो म्हणतो .

भारतीय निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी फक्त भारतीय नागरिकत्व आणि वयाची अट एवढेच महत्त्वाचे मानले जाते. त्या उमेदवार व्यक्तीला शासन कारभाराची जाण आहे किंवा नाही? तो हुशार, बुद्धिमान, उच्चशिक्षित आहे का? याचा विचार आपण करत नाही. म्हणून अशिक्षित, ज्यांना शासन कारभाराचा कुठलाही अनुभव नसतो असे काही व्यक्ती सुद्धा लोकशाहीच्या नावाखाली निवडणुकीच्या माध्यमातून निवडून येऊन शासन कारभार चालवत असतात. मग अशा लोकप्रतिनिधीकडून जनहिताची ,देशहिताची अपेक्षा कशी ठेवायची असा प्रश्न भारतीय नागरिकांना पडला पाहिजे . अलीकडील यू.जी.सी.च्या नवीन निर्णयानुसार जर प्राध्यापक व विद्यापीठ कुलगुरू पदाची पात्रता नसणारा व्यक्ती पण जो विशिष्ट क्षेत्रामध्ये तज्ञ आहे , पारंगत आहे अशा व्यक्तीस त्याची शैक्षणिक पात्रता न पाहता सरळ त्या पदावर नियुक्त केले जाणार आहे. त्याच पद्धतीने प्लेटोने म्हटल्याप्रमाणे ज्या व्यक्तीस शासन कारभारची जाण आहे, तो हुशार, बुद्धिमान, सुशिक्षित आहे तर त्याला सरळ राज्यकारभारात सहभाग देणे काही गैर नाही. परंतु लोकशाहीत निवडणुका या प्रतिनिधी निवडण्याचे एक मध्यम आहे त्याला नाकारता येत नाही, या अर्थाने निवडणूका घेऊन जनप्रतिनिधी निवडणे हा लोकशाही मार्ग असेल परंतु यामुळे योग्य उमेदवार निवडले जातील याची शास्वती नसते . म्हणून किमान लोकप्रतिनिधीच्या पत्रातेमध्ये उच्च शिक्षणाची अट व शासकीय किंवा प्रशासकीय कामाच्या अनुभवाची अट असणे गरजेचे वाटते.

भारतीय निवडणुकीतील आणखी एक दोष म्हणजे भारतात ज्या उमेदवाराला मतमोजणीत सर्वाधिक मते मिळतात त्याला निर्वाचित घोषित करण्याची पद्धत आहे त्यास ' फर्स्ट पास्ट दि पोस्ट सिस्टिम' असे म्हणतात. त्यामुळे कमी मते मिळविणारा उमेदवार निवडला जातो. भारतातील मतदानाची सरासरी टक्केवारी ५५ ते ६० टक्के इतकी असते यातून मतदाराची निषक्रीयता दिसून येते . ही ६० टक्के मते अनेक उमेदवारांत विभागली जातात आणि बहुसंख्य मतदारसंघातील लढती तिरंगी किंवा त्याहून अधिक असतात. या परिस्थितीत राजकारणी मंडळी विविध आघाड्या करू शकतात, आणि या जोडतोडीच्या राजकारणात असंख्य समाजघटक मोठ्या प्रमाणात बाहेर सारले जातात. तसेच भारतात निवडणुकीमध्ये उमेदवार मतदारांना वेगवेगळे आमिषे , प्रलोभन दाखवत असतात व आश्वासने देत असतात. त्याचाही परिणाम निवडणुक निकालांवर होतो त्यामुळे योग्य, हुशार, बुद्धिमान , कार्यक्षम, शासनाची जाण असणारा उमेदवारच निवडला जाईल याची खात्री देणे शक्य नसते. निवडणुकीमध्ये आश्वासने देणे इथपर्यंत ठीक होते परंतु अलीकडे तर सत्ताधारी वर्गाकडून निवडणुकांच्या अगोदरच जन कल्याणकारी योजनांच्या नावाखाली मतदारांना खुश करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे निवडणुकांमधील निष्पक्षता , पारदर्शकता याला तडे जात आहेत.अशा वेळी स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक आयोगाची भूमिका महत्वाची ठरते.परंतु भारतामध्ये स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक आयोगाचा अभाव दिसून येतो .

भारतीय निवडणूक आयोग ही भारत सरकारच्या अखत्यारीतील एक स्वायत्त संविधानिक संस्था आहे. संविधानातील कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली गेली आहे. भारतातील निवडणुकींसाठी निवडणूक आयोग सर्वस्वी जबाबदार आहे. मतदारसंघ आखणे,मतदारयादी तयार करणे,राजकीय पक्षांना मान्यता देणे, निवडणूक चिन्हे ठरवणे,अपक्ष उमेदवाराला चिन्ह देणे,निवडणुका पार पाडणे,उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचा ताळमेळ लावणे इत्यादी कार्य निवडणूक आयोगाला करावे लागतात. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी निवडणूक आयोगाच्या निष्पक्ष व पारदर्शक कारभार महत्त्वाचा असतो . परंतु अलीकडे निवडणूक आयोगाच्या निष्पक्षता व पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत. कारण निवडणूक आयोग सत्ताधारी वर्गाला अनुकूल निवडणुका जाहीर करणे ,निवडणुकांचे टप्पे ठरवणे, निवडणूक प्रचार काळात विरोधी पक्षातील नेत्यांच्या भाषणावर आक्षेप घेणे , राजकीय पक्षा संदर्भात तसेच निवडणुकीतील वाद, संघर्ष इत्यादी बाबतच्या खटल्याचे निर्णय सत्ताधारी पक्षाच्या बाजूने देणे. अशा काही घटनांमुळे निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

राष्ट्रपती पंतप्रधानाच्या सल्ल्याने निवडणूक आयुक्तांच्या नियुक्त्या करतात . परंतु ही पद्धत निवडणूक आयोगाच्या स्वातंत्र्याचे उल्लंघन करते म्हणून त्याविरुद्ध सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आले होते . मार्च २०२३ मध्ये अनुप बरनवाल विरुद्ध भारत संघ या याचिकेच्या संदर्भात न्या. के.एम.जोसेफ यांनी असा निर्णय दिला की, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठीच्या समितीमध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असेल .परंतु सुप्रीम कोर्टाच्या निर्णया नंतरही निवडणूक आयोगावर सरकारचे नियंत्रण अबाधित राहावे म्हणून केंद्र सरकारने डिसेंबर २०२३ मध्ये निवडणूक आयुक्तांच्या नियुक्त्या संदर्भात एक कायदा संमत केला. त्यानुसार निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रपतींना सल्ला देण्यासाठीच्या समितीमध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि पंतप्रधान नियुक्त एक वरिष्ठ केंद्रीय मंत्री यांचा समावेश केला . त्यामुळे निवडणूक आयोगाचे स्वतंत्र्य पुन्हा एकदा धोक्यात आले आहे. अशाप्रकारे स्वतंत्र निष्पक्ष व पारदर्शक निवडणूक आयोगाचा अभाव हे भारतीय लोकशाहीला घातक आहे.

**लोकप्रतिनिधींची ढासळती प्रतिमा -**

विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका हे भारतीय लोकशाहीचे तीन प्रमुख स्तंभ आहेत. विधिमंडळात निवडून आलेल्या प्रतिनिधींचा समावेश असतो. आपले निवडून आलेले लोकप्रतिनिधी उत्तरदायी आणि सक्षम आणि स्वच्छ चारित्र्याचे असतील तर लोकशाही मजबूत होईल. लोकांच्या सेवा, हक्क, संरक्षण आणि भल्यासाठी कायदेमंडळाने बनवलेले कायदे कार्यकारिणीद्वारे अंमलात आणले जातात. न्यायपालिका देखील घटनात्मक चौकटीत कायदा आणि लोकशाहीचे संरक्षण सुनिश्चित करते. अलीकडे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची नैतिक मूल्ये, कार्यशैली, कर्तृत्व आणि उत्तरदायित्व यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अनेक लोकप्रतिनिधींवर गुन्हेगारी , भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. अशा भ्रष्ट आणि गुन्हेगारी प्रवर्तीच्या लोकप्रतिनिधिंवर कायदेशीर कारवाई करणे सरकारचे काम असते . परंतु भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवर्तीच्या लोकप्रतिनिधीना सरकारच सत्तेसाठी पाठीशी घालत असेल तर अशी परिस्थिती लोकशाहीला मारक ठरत असते . भारतात बहुपक्ष पद्धती आहे त्यामुळे उमेदवार वेगवेगळया राजकीय पक्षांकडून निवडणुकीद्वारे कायदेमंडळावर निवडले जातात . निवडून गेल्यानंतर सत्तेत सहभागी होण्यासाठी उमेदवार आपल्या पक्षाप्रति निष्ठा व विचारसरणी यास तिलांजली देऊन दुसऱ्या पक्षामध्ये प्रवेश करत आहेत . पक्षांतर बंदी कायदा असून सुद्धा त्यामधून पळवाटा शोधून काढल्या जात आहेत .अशा कृतीमुळे निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधिंची प्रतिमा जनमाणसात खराब होऊ लागली आहे. ते जनहिता ऐवजी स्वहिताचा विचार करताना दिसत आहेत.लोकप्रतिनिधींना सत्तेबरोबर जबाबदारी आणि उत्तरदायित्व असते याचा विसर पडत चालला आहे. जे भारतीय संविधानाच्या दृष्टीने चुकीचे आहे . अशा परिस्थितीत भ्रष्ट, चारित्र्यहीन, दलबदलू व गुन्हेगारी प्रवर्तीच्या लोकप्रतिनिधीना सत्तेबाहेर काढण्याची जबाबदारी जनतेवर येऊन पडते . भारतीय जनता निवडणुकीमध्ये आपल्या मताचा योग्य वापर करून उच्चशिक्षित ,चारित्र्यवान, बुद्धिमान , अनुभवी लोकप्रतीनिधींची निवड करून भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवर्तीच्या लोकप्रतिनिधीना सत्तेबाहेर काढू शकतात व लोकशाही अधिक बळकट करू शकतात .

**न्यायालयीन स्वातंत्र्याचा अभाव**

निष्पक्ष न्याय व्यवस्था लोकशाही मुल्ये सुनिश्चित करतात म्हणून भारतीय संविधानाने न्यायालयीन स्वातंत्र्यावर भर दिले आहे .न्यायालयीन स्वातंत्र्य म्हणजे न्यायालये शासनाच्या इतर शाखांपासून स्वतंत्र असणे. न्यायालयीन स्वातंत्र्य ही आधुनिक लोकशाही राज्यातील महत्त्वाची संकल्पना आहे. न्यायालयीन स्वातंत्र्यामुळे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण होते, संविधानाचे पावित्र्य जपले जाते , न्यायालये आपली कर्तव्ये न घाबरता किंवा निपक्षपातीपणे पार पाडू शकतील आणि लोकशाही तत्त्वांची जोपासणा होते. परंतु अलीकडे कार्यकारिणीपासून स्वतंत्र असलेल्या भारताच्या न्यायव्यवस्थेला टीकेचा सामना करावा लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निवृत्त न्यायाधीशांनी असे म्हटले आहे की, काही प्रकरणांमध्ये नागरी स्वातंत्र्य राखण्यात न्यायालयाच्या अक्षमतेमुळे, लोकांना जामीन नाकारल्याने आणि पोलिसांकडून देशद्रोह आणि दहशतवादविरोधी कायद्यांचा गैरवापर केल्यामुळे भारताची लोकशाही धोक्यात येत आहे. न्यायाधीश म्हणून निवृत्त झाल्यानंतर आणि इतर सरकारी नियुक्त्यांमधून निवृत्तीनंतर काही न्यायाधीश खासदार बनणे, त्यांच्या नीतिमूल्यांवर गंभीर प्रश्न निर्माण करतात. न्यायमूर्तींच्या नियुक्तीसाठी न्यायालयीन कॉलेजियम पद्धतीतही सरकार ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करत आहे. अशा प्रकारे सरकार न्यायव्यवस्थेवर प्रभाव टाकू पाहत आहे, जे घटनाबाह्य आहे .

**निष्पक्ष प्रसारमाध्यमांचा अभाव**

प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. उत्तरदायित्व निश्चित करणे आणि प्रशासन आणि धोरणांच्या अपयशावर सरकारला प्रश्न करणे ही प्रसार माध्यमांची मुख्य जबाबदारी आहे. जनजागृती करणे आणि जनमताला आकार देणारी माहिती प्रदान करणे ही त्याची महत्त्वाची भूमिका आहे. हे लोकशाहीचे शक्तिशाली साधन आहे.अलीकडे प्रसारमाध्यमे तटस्थ राहण्याऐवजी पक्षपाती राहून संविधान आणि लोकशाहीला धोका निर्माण करत आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म खळबळजनक आणि प्रक्षोभक बातम्या पसरवून जनमानसात भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत. खोट्या बातम्या आणि आकडेवारीमुळे समाजात संभ्रम निर्माण होत आहे .त्यामुळे ते जनतेचा विश्वास गमावत आहेत. आजकाल, मुक्त प्रेसवर हल्ला होत आहे. निष्पक्ष पत्रकारांचा छळ करण्यात येत आहे.त्यांच्यापैकी अनेकांवर खोट्या देशद्रोहाच्या आरोपांसह फौजदारी खटला चालवला जात आहे. प्रेस स्वातंत्र्य निर्देशांकात १८० देशांपैकी आपला देश १६१ व्या क्रमांकावर घसरला, हे आपल्या मजबूत लोकशाहीसाठी चांगले लक्षण नाही.म्हणून प्रसारमाध्यमांनी निस्पक्षपणे, कुणाच्याही दबावाशिवाय स्वतंत्रपणे आपले कार्य करणे गरजेचे आहे .

**सारांश**

वरील परिस्थिती बरोबरच संसदेची ढासळणारी प्रतिमा, अभिव्यक्ती स्वतंत्र्यावरील बंधने , राज्यपालांचे पक्षपाती भूमिका, केंद्रीय एजन्सीचा गैरवापर, सत्तेच्या केंद्रीकरणावर भर, राजकीय लिंगभेद, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, व्यक्तिकेंद्रित राजकारण, लोकप्रतिनिधींमधील वैचारिकता व नैतिकतेचा अभाव, नागरी चळवळ दाबण्याचे प्रयत्न, धार्मिक धुर्विकरण इत्यादी घटक भारतीय संविधानिक लोकशाही शासन व्यवस्थेस आव्हान देत आहेत. याद्वारे भारतीय लोकशाही कमजोर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा सर्व गैरप्रकार थांबवणे गरजेचे आहे.

भारतीय लोकशाहीचे व संविधानाचे रक्षण करण्याची अंतिम जबाबदारी जनतेची आहे .कारण संविधानाने जनतेच्या हातामध्ये मतदानरुपी शस्त्र दिलेले आहे की ज्या शस्त्राचा वापर करून जनतेने योग्य, सक्षम, जबाबदार शासन निर्माण करावे. शासन व्यवस्थे कडून संविधानाची होत असलेली पायमल्ली, लोकशाहीचा होत असलेला ऱ्हास याला जबाबदार भारतीय नागरिकच आहे. कारण त्याने आपल्या मताचा योग्य वापर करून योग्य व्यक्तीची निवड करणे गरजेचे असते. परंतु भारतामध्ये जनता मतदानाप्रती उदासीन दिसून येते 50 ते 60% च्या वर मतदान जात नाही. मतदानामध्ये पैसे घेऊन मतदान केले जाते. जनतेमध्ये राजकीय सामाजिकरणाचा अभाव आहे. वरील परिस्थिती सुधारण्यासाठी जनतेने शासन व्यवस्थेच्या कार्यावर डोळसपणे लक्ष ठेवले पाहिजे . एकदा मतदान केले म्हणजे आपले काम संपले असे नसते. कारण आपण जे प्रतिनिधी निवडून देतो ते योग्य प्रकारे काम करतात की नाही हे पाहण्याची जबाबदारी सुद्धा आपली आहे. एखादा लोकप्रतिनिधी आपलं काम योग्य प्रकारे करत नसेल तर त्यांना पुढच्या पाच वर्षांमध्ये बाजूला करून नवीन कार्यक्षम व्यक्तीची निवड आपण करू शकतो. अशाप्रकारे जनतेने शासन व्यवस्थेप्रति दक्ष असले पाहिजे. तरच भारतीय लोकशाही बळकट होईल.

**संदर्भ सूची –**

1. कुलकर्णी बी .वाय .(२०२३) भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया – एज्युकेशनल पब्लिकेशन औरंगाबाद
2. कोळंबे रंजन (२०२२) भारतीय राज्यघटना आणि शासन –भागीरथ प्रकाशन पुणे
3. सिंह उदयभान , (2023) – भारतीय संविधान एव राज्यव्यवस्था – प्रभात प्रकाशन नई दिल्ली
4. डॉ.येरणकर श्रीराम , डॉ. कायन्दे संतोष(२०१९) – राजकारणातील आधुनिक संकल्पना आणि विचार
5. वर्तमानपत्रातील लेख (लोकसत्ता , लोकमत , पुढारी, महाराष्ट्र टाइम्स )
6. इंटरनेट संकेतस्थळ